**—: प्रेसनोट :—** दि. ०६/१०/२०२०

**यातील फिर्यादी यांचे अशिलाचे वतीने एका व्यक्तीचे सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता यातील खाजगी एजंट व वकीलाने लोकसेवकावर प्रभाव टाकुन काम करुन घेण्याकरीता फिर्यादी यांचेकडे रु. १०,०००/—लाचेची मागणी करुन स्विकारली म्हणुन गुन्हा नोद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १५/२०२० |
| कलम | ७ (अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) सुहास अशोक रोकडे, वय ३५ वर्षे, धंदा—खाजगी एजंट, मुलुंड तहसिलदार कार्यालय, मुलुंड, मुंबई.<br>२) ॲड. संदिप रमेश सोनवणे, वय ४० वर्षे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे लॉ कॉलेजमध्ये अंतिम वर्षाचे शिक्षण धेत असुन ते एका वकीलांकडे वकीली व्यवसायाचे कामाबाबत प्रशिक्षण घेत आहेत.<br>दिनांक २८/०९/२०२० रोजी फिर्यादी हे मुलुंड तहसिलदार कार्यालयात अशिलाचे वतीने एका व्यक्तीचे सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी गेले असता, तेथील लोकसेवकाने सदरहू काम करण्याकरीता रु. ५,०००/— लाचेची मागणी केली.<br>फिर्यादी यांना लोकसेवकास लाच दयावयाची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. २९/०९/२०२० रोजी समक्ष हजर राहून लोकसेवका विरुध्द लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांच्या लेखी तक्रारीवरुन दिनांक २९/०९/२०२० व ३०/०९/२०२० रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आरोपीत क्र. १ यांने तहसिलदार कार्यालय, कुर्ला, मुलुंड (पश्चिम), मुंबई येथील लोकसेवकावर प्रभाव टाकुन काम करुन घेण्याकरीता रुपये १०,०००/— लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानुसार दिनांक ०६/१०/२०२० रोजीचे सापळा कारवाईमध्ये आरोपीत खाजगी इसम एजंट सुहास अशोक रोकडे व ॲड. संदिप रमेश सोनवणे यांनी फिर्यादी यांचेकडुन रु. १०,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणून त्यांना रंगेहाथ पकडले. |

( रमेश धुमाळ )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क—** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
**संकेतस्थळ**—acbmaharastra.gov.in
**ईमेल—** १) acbwebmail@mahapolice.gov.in २) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
**ऑनलाईन तक्रार**
**मोबाईल ॲप** www.acbmaharastra.net. **टोल फ्रि.क्र**. १०६४
**फेसबुक** www.facebook .com – Maharashtra ACB **व्हॉटस ॲप क्र**. ९९३०९९७७००
**दुरध्वनी क्र**. ०२२ २४९२१२१२ **फॅक्स. क्र**. ०२२२४९२२६१८,